D I A C

Digital Institute for Administrative Careers

*THE BEST LEARNING APP FOR COMPETITIVE EXAMS*

# MPSC राज्यसेवा पूर्वपरीक्षा

## PRELIMS RESULT ANALYSIS

©2018 D.I.A.C.

# मागच्या काही वर्षातील पूर्वपरीक्षेच्या निकालांचे विश्लेषण :

MPSC पूर्वपरीक्षे मध्ये, त्या वर्षी उपलब्ध रिक्त पदांच्या संख्ये बदल्यात किती विद्यार्थी मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरवले जातात याची माहिती या ठिकाणी तुम्हाला मिळेल . यावरून विद्यार्थ्यांना अंदाज घेता येईल कि दरवर्षी साधारण 2 लाख मुले पूर्वपरीक्षेसाठी अर्ज करतात त्यातील किती जणांची निवड केली जाते आणि किती गुण त्यासाठी घेणे गरजेचे आहे .

मुख्य परीक्षेच्या ऐवजी पूर्व परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना जास्त स्पर्धा करावी लागत असल्याचे चित्र तुम्हाला दिसेल . CSAT या पेपर मुळे ENGINEER , DOCTOR असलेले विद्यार्थी ज्यांचा पहिल्या पेपर चा एवढा अभ्यास नसतो ते पुर्वपरीक्षेमध्ये चांगला स्कोर करून मुख्य परीक्षेसाठी पात्र होतात , पुढे मुख्य परीक्षेमध्ये बरेचदा त्यांना मूळ विषयांचा अभ्यास नसल्यामुळे यश मिळत नाही पण पूर्व परीक्षेमध्ये इतर विद्यार्थ्यांना ज्यांच APTITUTE, MATH, ENGLISH COMPREHENSSION कमकुवत आहे अशांना त्यांचा फटका बसू शकतो. आणि यामुळेच मुख्य परीक्षेपेक्षा पूर्व परीक्षा दर वर्षी अवघड बनत असल्याचे दिसत आहे .

तसेच स्पर्धा परीक्षांचा वाढलेला प्रसार आणि त्यातील धोके याचीही माहिती तुम्हाला या लेखातून मिळेल . mpsc साठी अभ्यास करताना किंवा या क्षेत्रा मध्ये येताना अशी काही माहिती विद्यार्थ्यांना कुठला क्लास सांगत नसेल पण हि माहिती विद्यार्थ्यांसाठी खूप जास्त महत्वाची आहे . पुढील तक्त्या वरून तुम्हाला काही अंदाज कळेलच. यामध्ये दरवर्षी किती जागा निघतात तसेच किती जण पास होतात याचे गुणोत्तर दिलेले आहे . तसेच पुढे त्याचे विश्लेषण करून मार्गदर्शन केलेले आहे . विद्यार्थ्यांना याचा खूप फायदा होईल .

| वर्ष | रिक्त जागा | मुख्य परीक्षा पात्र संख्या | selection ratio for prelims to mains | मुलाखतीसाठी पात्र संख्या | ©2018 D.I.A.C. अंतिम निवड यादी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 2016 | 109 | 1575 | 1:15 | 418 | 130 |
| 2015 | 216 | 4722 | 1:22 | 1138 | 368 |
| 2014 | 183 | 6395 | 1:34 | 1367 | 183+ |
| 2013 | 265 | 4341 | 1:12 | * | 364 |

©2018 D.I.A.C.

वरील तक्त्या वरून विद्यार्थ्यांनी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे कि

२०१४ ला ६३९५ मुले पूर्व परीक्षा पास झाले पण

त्यातील १३६७ मुले मुख्य परीक्षा पास झाले होते आणि

त्यातील १८३ विद्यार्थी अधिकारी बनले ,म्हणजे

उरलेले ५०२८ जे एक पूर्वपरीक्षा पास आहेत

आणी

११८४ विद्यार्थी ज्यांनी एकदा मुलाखत दिलेली आहे हे सर्व विद्यार्थी पुढच्या वर्षी

२०१५ ला येणाऱ्या पूर्व परीक्षेमध्ये तुमचे स्पर्धक असणार आहेत.

©2018 D.I.A.C.

## MPSC 2015 मध्ये

©2018 D.I.A.C.

पूर्व परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी – 1,70,237

पूर्व परीक्षा पास झालेले विद्यार्थी – 4722

मुख्य परीक्षा पास झालेले म्हणजेच मुलाखतीसाठी पात्र विद्यार्थी संख्या – 1138

आणि सर्वात शेवटी अंतिम यादी मध्ये निवड झालेले विद्यार्थी – 368

**म्हणजेच 2015 सालचा selection ratio 0.21%**

२०१५ च्या निकालावरून असे दिसते कि एकदा पूर्व परीक्षा पास झालेले काही विद्यार्थ्यांना देखील २०१५ च्या पूर्वपरीक्षे मध्ये अपयश पहाव लागलेले आहे .

## MPSC 2016

©2018 D.I.A.C.

पूर्व परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी – 1,91,563

पूर्व परीक्षा पास झालेले विद्यार्थी – 1575

मुख्य परीक्षा पास झालेले म्हणजेच मुलाखतीसाठी पात्र विद्यार्थी संख्या – 418

आणि सर्वात शेवटी अंतिम यादी मध्ये निवड झालेले विद्यार्थी – 130

**म्हणजेच 2016 सालचा selection ratio 0.07%**

असेच

एकदा दोनदा पूर्वपरीक्षा पास झालेले तसेच मुलाखत दिलेल्या बऱ्याच मुलांसोबत तुम्हाला पुर्वपरीक्षे मध्ये स्पर्धा करावी लागणारे त्यामुळेच पूर्वपरीक्षा पास होणे जास्त कठीण वाटते .

आणि *म्हणूनच आम्ही सांगतो कि MPSC करायला पुणे मुंबई ला जाणारे आणि महागडे class केलेले ९९ % विद्यार्थी हे २/३ वर्ष प्रयत्न करूनही एकवेळची पूर्वपरीक्षा देखील पास होऊ शकत नाहीत .*

*त्यामुळे पुणे मुंबई जायचा नाद सोडा ,आहात तिथे राहून अभ्यास करा आणि प्रेलीम्स पास करुन् पहा .* पूर्व आणि मुख्य परीक्षे मध्ये ४/५ महिने अवधी असतो त्यात फक्त मुख्य परीक्षेच्या विषयांचा

अभ्यास आणि पूर्व मुख्य मधल्या समान असलेल्या विषयांची (उजळणी) Revision आरामात होते.

प्रिलिम्स पास होण्यासाठी लागणारे कष्ट, तेवढा अभ्यास तुम्ही करू शकलात तरच पुढे मुख्य परीक्षेचा अभ्यास तुम्ही करू शकाल अन्यथा नाही हे डोक्यात ठेवा नेहमी करता. इथे किती कष्ट लागतात काय कराव लागत नेमकं ते जाणून घ्या मग पुढे जा .

परीक्षा अवघड आहे म्हणून त्यात भाग घ्यायचा नाही असे नाही परंतु आपल्या आपल्या क्षमतेनुसार आपण रिस्क घ्यावी .

आत्ता अभ्यासाला लागा आणि डॉक्टर बना म्हटले तर काय म्हणाल तुम्ही कि त्याला खूप अभ्यास करावा लागतो . इथे पण तेच आहे इथे पण अभ्यास करावा लागतोच फक्त एवढच कि काही विषय तुम्हाला सोपे वाटतात.

आत्ता तुम्ही ओलम्पिक मध्ये मेडल जिंकून यायचं ठरवले तर ते जमणारे का ?

तुम्हाला आत्ता गाण्याच्या क्षेत्रा मध्ये अर्जित सिंग किंवा लता मंगेशकर सारखे यश मिळवायला सांगितले तर जमेल का ?

किंवा आत्ता तुमचा आवडता खेळ क्रिकेट चे प्रशिक्षण घ्यायला सुरुवात करा आणि टीम इंडिया मध्ये जाऊन दाखवा म्हटले तर जमणारे का तुम्हाला ???

खुद्द सचिन तेंडूलकर ने जरी तुम्हाला कोचिंग दिले तरी तुम्ही क्रिकेट मध्ये यशस्वी होणार याची खात्री नाही , लाखो रुपये खर्च करूनही या अशा गोष्टी तुम्हाला जमणार नाहीत हे समजते तर मग MPSC चा महागडा क्लास लावला आणि मोठ्या शहरात जाऊन अभ्यास केला म्हणजे आपण पास होणार हा विचार विद्यार्थ्यांच्या डोक्यात येतोच कसा ???

असे कित्येक विद्यार्थी आहेत ज्यांनी घरी बसून अभ्यास केला आणि फक्त मुलाखतीसाठी पुण्याला जाऊन MOCK INTERVIEW दिले व जास्त पैसे खर्च न करता देखील आज अधिकारी बनलेले आहेत .

दरवर्षी निवड झालेल्या पैकी २०/३० जण तुम्हाला वेगळ्या वेगळ्या ठिकाणी कार्यक्रमात तसेच विविध उपक्रमात तसेच YOUTUBE वरती भाषण देताना सारखे तेच चेहरे दिसत राहतात कारण यशस्वी विद्यार्थ्यांचे भांडवल बनवून हे क्लास वाले तुम्हाला स्वताचा मोठेपणा सांगत असतात

मुळात त्यातले कित्येक विद्यार्थी हे त्या क्लास मध्ये गेलेले सुद्धा नसतात पण सत्काराच्या नावाखाली हे क्लास वाले त्यांना बोलवतात आणि यांच्या सत्कारामध्ये आपली मार्केटिंग साधून घेतात हि वस्तुस्थिती आहे .

हे TV किंवा VIDEOS मध्ये दिसणारे विद्यार्थी सोडले तर बाकीचे पण भरपूर असे विद्यार्थी अधिकारी बनलेले आहेत ज्यांचा या क्लास वाल्यांशी काहीही संबंध नसतो . आपल्या आपल्या घरी बसून त्यांनी अभ्यास केलेला असतो . त्यांना स्वताच्या क्षमता आणि मर्यादा माहित असतात सर्व बाजूनी विचार करून ते (calculated risk) या परीक्षांचा अभ्यास करतात आणि फालतू पैसा खर्च न करता स्वअभ्यासावर अधिकारी बनतात .

विद्यार्थ्यांनी या सर्व गोष्टींचा गांभीर्याने विचार करावा आणि मगच या स्पर्धा परीक्षांच्या नादी लागावे .

*आम्ही तुम्हाला हे सर्व  सांगितले म्हणून तुम्ही आमचा क्लास लावा असे अजिबात समजू नये .*

तुम्ही क्लास लावा नाहीतर लावू नका पण जर तुम्ही स्वत अभ्यास करणार नसाल किंवा एवढा मोठा अभ्यास तुमच्याने होणार नसेल तर कुठलाच क्लास तुम्हाला पास करु शकणार नाही.

आमचा क्लास त्या विद्यार्थ्यांसाठी आहे जे आहेत तिथून अभ्यास करण्यावर भर देतात . ज्यांची मनातून इच्छा आहे कष्ट करायची तयारी आहे पण मार्गदर्शन मिळत नाही अशा विद्यार्थ्यांचा सहभाग आमच्या डिजिटल चळवळी मध्ये आहे..

आमची अपेक्षा एवढीच आहे कि आयुष्याचे निर्णय हे विचार करून घ्या . तुमच्या आजूबाजूला जर कुणी असे आंधळेपणाने या क्षेत्राकडे जात असतील तर त्यांना सावध करा . पैसा परत मिळवू शकतो पण गेलेली वेळ परत मिळवता येत नाही . त्यामुळे आयुष्याची महत्वाची वर्षे मृगजळाच्या मागे घालवू नका .

तुमच्या सारख्या सुशिक्षित  लोकांकडून तोंडी होणारी आमची जाहिरात आम्हाला पुरेशी आहे कारण आमची योग्यता हीच आमची जाहिरात आहे .

तुमच्या स्पर्धा परीक्षा अभ्यासासाठी आमच्या शुभेछया ........!!!!

आणि हो.....!!

**काही मदत लागलीच तर नक्की Email : diacofficial@gmail.com करा .**

**होईल ती सर्व मदत आम्ही करु.**

©2018 D.I.A.C.